# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.08.2025** **वार:शुक्रवार**

1. संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित, लोकसभेत 12 तर राज्यसभेत 15 विधेयकं मंजूर
2. गणेशोत्सवासह दिवाळी आणि छट पूजेसाठी विशेष गाड्या सोडण्याचा रेल्वेचा निर्णय
3. अमेरिकेनं भारतावर लादलेल्या आयात शुल्काला इष्टापत्तीमध्ये परिवर्तीत करा-मुख्यमंत्र्यांचं आवाहन आणि
4. पालघरमध्ये तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कंपनीत वायू गळती होऊन 4 कामगारांचा मृत्यू

**संसद अधिवेशन**

संसदेचं पावसाळी अधिवेशन काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनादरम्यान लोकसभेत 14 विधेयकं सादर करण्यात आली आणि त्यातील 12 विधेयकं मंजूर करण्यात आली. या काळात ऑपरेशन सिंदूरवर दोन दिवस विशेष चर्चा घेण्यात आली. त्याचा समारोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तराने झाल्याची माहिती सभापती ओम बिर्ला यांनी दिली. या अधिवेशनात केवळ 37 तास काम पार पडले, असं सांगून लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यसभेत केवळ 38 टक्के कामकाज झालं आणि 15 विधेयकं मंजूर झाली. या अधिवेशनात सदस्यांचं वर्तन आणि त्यांनी वापरलेली भाषा हे संसदेच्या प्रतिष्ठेला साजेसं नव्हतं. संसदीय शिष्टाचार राखण्यासाठी याबाबत काळजी घेणं ही सदस्यांची सामूहिक जबाबदारी आहे असं बिर्ला म्हणाले.

**गेमिंग नियमन**

या अधिवेशनात ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक 2025ला मंजुरी मिळाली; ऐकुया एक वृत्तांत....

**ई-स्पोर्ट्स आणि सोशल गेमला प्रोत्साहन देतानाच सर्व प्रकारच्या ऑनलाइन जुगार आणि रिअल मनी गेमवर बंदी घालण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेल्या; ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक 2025 ला काल संसदेची मंजुरी मिळाली. लोकसभेत आधीच मंजूर झालेलं हे विधेयक काल राज्यसभेत केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सादर केलं. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर डीडी न्यूजशी बोलताना अश्विनी वैष्णव म्हणाले......**

***इस बिल में पहला सेगमेंट ई स्पोर्ट्स और ऑनलाइन सोशल गेमिंग सेकंड सेगमेंट इन दोनों के प्रमोशन का प्रावधान है। लेकिन जो तीसरा सेगमेंट है ऑनलाइन मनी गेम्स जिसके कारण सोसायटी में बहुत बडी नुकसान हो रहा है, और जगह जगह से देशभर से खबरें भी है, इस बिल में ऑनलाईन मनी गेमिंग के एडवर्टाइजमेंट्स पर भी प्रतिबंध है, और जो फायनान्शियल ट्रांजेक्शन्स करते हैं ऑनलाइन मनी गेमिंग के उस पर भी प्रतिबंध है, और इनके लिए कडी सजा का प्रावधान भी है।***

**सायबर सुरक्षा आणि पर्यायाने राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हे विधेयक महत्त्वाचं ठरेल असा विश्वास पुण्यातील सायबरतज्ञ ऍडव्होकेट राजस पिंगळे यांनी व्यक्त केला....**

*त्याच्यामध्ये एक अजून एडवांटेज असं आहे, त्याच्यामध्ये की ई स्पोर्ट्स हे त्यांनी रिकॉग्नाइज केलं आहे, ऑफिशियली काही नवीन अपॉर्च्युनिटीज लोकांना ओपन अप होतील लोकं स्टार्टअप्स चालू करतील अजून टेक इनोव्हेशन होईल या सगळ्या गेम्समध्ये तर एक चांगला बेनिफिट आहे, त्याच्यानंतर ऑनलाईन गेम्स आहेत की ज्याच्यामध्ये आपण वेजर करतो किंवा त्याच्यामध्ये आपण स्टिक्स लावतो हे सगळे गेम्स चान्स कम्प्लीटली बॅन केलेले आहेत त्यांनी की ज्याचं ज्याच्यामध्ये एडिक्शन होतं लोकांना फायनान्शियल लॉसेस बऱ्याच लोकांना झालेल्या आहेत सायकोलॉजिकली लोकं अफेक्ट होतात याच्या आधी सुसाईडस पण झाल्या. एक अजून आहे की नॅशनल सिक्युरिटीच्या पर्सपेक्टिव्ह मधनं पण या बिलमध्ये एक चांगला बेनिफिट होऊ शकतो कारण की याच्यामध्ये ऑनलाईन गेमिंगचा वापर तर मनी लॉन्ड्रिंगसाठी पण व्हायचा किंवा टॅक्स इव्हेड करण्यासाठी पण व्हायचा आणि अजून अनलॉफुल एक्टिव्हिटीज करण्यासाठी पण व्हायचं ते आता मला तरी वाटतंय बऱ्यापैकी रेग्युलेट होईल.*

**अहिल्यानगर इथले ऍडव्होकेट आनंद सूर्यवंशी यांनीही ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयकाचं स्वागत केलं आहे.......**

*नुकताच सरकारने जे संसदेत विधेयक पारित केलेलं आहे गेमिंग कायद्याविरोधात आम्हाला खूप आनंद वाटतोय या कायद्याअगोदर अनेक कुटुंब उध्वस्त झालेले आहेत तरुणाईचं खूप मोठं नुकसान होत होतं जवळ जवळ वीस हजार कोटी रूपयांच्या प्रतिवर्षाला नुकसान होत होते आणि सरकारने हा जो कायदा पारित केलेला आहे तर हे सर्वसामान्यांसाठी नवीन विद्यार्थी वर्ग असेल कुटुंब असतील सर्वसामान्य यांच्यासाठी खूप खूप मोठं संरक्षण केलेलं आहे आणि या कायद्याचं आम्ही स्वागत करतो.*

**अर्ज दाखल**

इंडीया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार, यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून सी. पी. राधाकृष्णन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अर्जांची छाननी आज होणार असून 25 ऑगस्टपर्यंत अर्ज मागे घेता येतील. येत्या 9 सप्टेंबरला उपराष्ट्रपती पदासाठी मतदान होणार आहे.

**वैष्णव जादा गाड्या**

दिवाळी आणि छट पूजेसाठी 12 हजारांपेक्षा जास्त विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय भारतीय रेल्वेनं घेतला आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. 13 ते 26 ऑक्टोबर दरम्यान प्रवास सुरु करून, 17 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर दरम्यान परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना परतीच्या तिकिटावर 20 टक्के सवलत दिली जाईल, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**संधी**

अमेरिकेनं भारतातून आयात होणाऱ्या मालावर शुल्क लावून भारताला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या मालासाठी पर्यायी बाजारपेठ शोधून अमेरिकेनं लादलेल्या शुल्क आपत्तीला इष्टापत्तीत परावर्तित करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. या आपत्तीला संधी मानून राज्याच्या व्यवसाय सुलभता अर्थात 'इज ऑफ डूईंग बिझनेस' मध्ये जास्तीत जास्त बदल करण्यात यावेत. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी

स्वतंत्र 'वॉर रूम' ची निर्मिती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. मुंबईत जागतिक आयात-निर्यात धोरणाच्या अनुषंगानं करण्यात येणाऱ्या उपाय योजनांबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते.

**<u>बैलपोळा- सोलापुर</u>**

राज्याच्या बहुतांश भागात आज बैलपोळ्याचा सण साजरा होत आहे. वर्षभर शेतात राबवणाऱ्या सर्जा राजा प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण..... ग्रामीण भागात काल ठिकठिकाणच्या नद्या आणि जलाशयांवर बैलांच्या खांदेमळणीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. बैलांची रंगरंगोटी करण्यासाठी तसंच सजावटीच्या साहित्याने ग्रामीण भागातल्या बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. बैलपोळ्याच्या निमित्तानं सोलापूर जिल्ह्यातील सोन्या बैलाची ही कहाणी.....

**मालकाने केलेल्या प्रेमाची बैलाने परतफेड केल्याचं एक अनोखं उदाहरण सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यात पहायला मिळतं. वाळूज इथले शेतकरी इंद्रसेन मोटे यांच्या घरच्या गायीला झालेल्या, सोन्या बैलाचे दोन्ही डोळे, कर्करोगामुळे काढावे लागले. हा निरुपयोगी बैल, विकून टाकण्याचा, सल्ला अनेकांनी इंद्रसेन यांना दिला पण तो धुडकावून लावत, इंद्रसेन यांनी या बैलाला आयुष्यभर सांभाळलं, सोन्या बैलानेही मालकाच्या या ऋणातून उतराई होण्याचा जणू मनोमन निर्धार केला. गेली पंधरा वर्ष हा दृष्टीहीन बैल आपल्या जोडीदारांच्या साथीने मालकाच्या शेतात राबतो आहे. याबाबत इंद्रसेन सांगतात..**

***त्या मोठ्या चित्रभारी या हिशोबाने आम्ही दु डोळं काढलं. पण त्याने आम्हाला शेवाच करून घेतली नाहीत त्यानेच आमची सेवा केली आमचं घर प्रपंच शेती भाडं तोडं मुलीचं शिक्षण सगळं त्यानं व्यवस्थित केलं आमचं***

**आपल्या मालकानं केलेल्या प्रेमापेक्षा काकणभर जास्त प्रेम बैल आपल्या मालकावर करत असतो; सोन्या बैलही मालकावर भार न होता, त्याच्या कुटुंबाचा आधार झाला आहे.**

**<u>नुकसान-नांदेड</u>**

नांदेड जिल्ह्यात चार दिवस झालेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे 3 लाख 25 हजार शेतकरी बाधित झाले आहेत. 2 लाख 69 हजार हेक्टर क्षेत्रावरील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. या बाधित पिकांचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले असून पंचनामे सुरू झाले आहेत. लवकरच हे पंचनामे पूर्ण होतील, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. ते म्हणाले.......

**आपल्या जिल्ह्यामध्ये ऑगस्ट महिन्यात पंचावन्न मंडळामध्ये अतिवृष्टी झालेली आहे. म्हणजे पासष्ठ एएम पेक्षा जास्त पाऊस झालेला आहे. आपल्या जिल्ह्यामध्ये साधारणतः साडे चार लाख हेक्टर सोयाबीन आहे, दोन लाख हेक्टर कापूस आहे. तर प्रामुख्याने जो लॉस आहे तो कापूस सोयाबीन, काही प्रमाणात उडीद मूग जे पंधरा पंधरा हजार हेक्टर आहे आणि नदीच्या काठी असलेला ऊस असा एक साधारणतः अंदाज आहे. आणि आत्तापर्यंत प्राथमिक अंदाज जो आहे दोन पॉइंट एकोणसाठ लाख हेक्टर आपलं जे बाधित क्षेत्र आहे, सव्वा तीन लाख शेतकरी आपले बाधित आहेत.**

**<u>निधन-नाशिक</u>**

लेहमध्ये कर्तव्य बजावत असताना प्रकृती खालावल्याने लष्कराचे जवान मोहन अहिरे यांचा मृत्यू झाला. नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील आराईचे सुपुत्र असलेले मोहन अहिरे यांची प्रकृती प्रतिकूल हवामानामुळे बिघडल्यानं त्यांना लष्कराच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. उपचार सुरू असताना दोन दिवसांपूर्वीच त्यांचं निधन झालं. आज, त्यांच्या पार्थिव देहावर अराई इथं लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<u>मृत्यू-पालघर</u>**

पालघर जिल्ह्यातल्या बोईसर- तारापूर औद्योगिक क्षेत्रातल्या एका औषध निर्माण कंपनीत वायू गळती होऊन 4 कामगारांचा मृत्यू झाला आहे. इतर 2 कामगारांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पालघरचे पोलिस अधीक्षक यतीश देशमुख यांनी दिली आहे.

**<u>पाऊस</u>**

वीर आणि उजनी धरणातील विसर्गामुळे भीमा नदीला पूर आला आहे; त्यामुळे पंढरपूरमधील नदी काठावरील 137 कुटुंबाचं सुरक्षा स्थळी स्थलांतर करण्यात आलं आहे. सांगली जिल्ह्यात कृष्णा नदीची पाणी पातळी आता हळूहळू कमी होऊ लागली आहे. मात्र  नागरी वस्तीत नदीचं पाणी शिरल्याने अनेक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. या काळात कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.